


# 1/4 इंच सीम फुट

## ह्या शिकवणीत तुम्ही उषा जानोम 1/4 इंच सीम फुटचा वापर करणे शिकाल.




एक समान शिवण ही एका चांगल्या शिंपीची खूण असते. ते कुठल्याही प्रकल्पाला एक सफाईदारपणा देते, जे नजरेसाठी आनंददायी असते. पॅचवर्क करणाऱ्यांसाठी समान शिवण एक गंभीर मुद्दा असतो. हे फुट तुम्हाला परिपूर्ण असे वन-फोर्थ इंच सीम शिवण्यास सक्षम करेल आणि हे विशेषतः अशा लोकांमध्ये प्रसिद्ध आहे जे पॅचवर्क करतात कारण हे असमान शिवणीचा ताण नाहीसा करते.

ह्या पाठाकरिता तुम्हाला ज्या साहित्याची आवश्यकता असेल, ते आहे उषा जानोम 1/4 इंच सीम फुट, कापडाचा एक किमान 8X8 इंचांचा चौरस तुकडा, धागा आणि कात्री. ह्या 1/4 इंच सीम फुटला जे विशेष बनवते, ते आहे ही इथे असलेली गाईडिंग प्लेट जी सुनिश्चित करते की तुम्ही 1/4 इंच शिवण शिवाल. आणि दुसऱ्या बाजूस असलेल्या ह्या दोन रेषा पिव्होटिंग करताना तुम्हाला मदत करतात.

चला सुरु करूया – सुरुवात करा साध्या प्रेसर फुटच्या जागी 1/4 इंच सीम फुट तडकून बसवून. कापड फुटखाली ठेवून सुनिश्चित करा की कपड्याचा काठ हा दिशादर्शक तबकडीच्या रेषेत आहे. फुट खाली करा.

आता तुमची मशीन सेट करा – पॅटर्न सेलेक्टर डायल 'ए' वर सेट करा आणि स्टीचची लांबी 2 आणि 3 च्या दरम्यान ठेवा.



एका सरळ रेषेत शिवण्यास सुरुवात करा, फुटच्या खालच्या रेषेपर्यंत, जी पिव्होटिंगला दिशा दाखवते, पोहोचते आणि कपड्याच्या काठच्या रेषेत असते – अगदी अशाप्रकारे.

तो परिपूर्ण कोपरा मिळवण्यासाठी...मी सांगितलेल्या पुढील टप्प्यांचे काळजीपूर्वक अनुसरण करा – सुई खाली करण्यासाठी फ्लायव्हील तुमच्या दिशेने फिरवा आणि कापड 90° नी फिरवा. सुनिश्चित करा की तुम्ही आत्ताच शिवलेल्या शिवणीचा, फुटच्या वरील भागातील खुणांसोबत मेळ बसलेला आहे. तुम्हाल आणखी एक सुनिश्चित करायचे आहे की काळ्या रंगाची गाईडिंग प्लेट कापडाच्या काठासोबत एका रेषेत आहे.. अशाप्रकारे.







शिवण्यास पुन्हा सुरुवात करा. कोपऱ्यांत त्याच प्रक्रियेचा अवलंब करा, जोपर्यंत तुम्ही शेवटच्या कोपऱ्याच्या शेवटी पोहोचत नाही.



सर्व बाजूंनी शिवल्यानंतर, धागा कापा आणि कपड्याचा तुकडा काढा. आणि शांत बसून समान शिवणीचा आनंद घ्या. तुमच्या उत्पादनात व्यवस्थितपणा आणि व्यावसाईक सफाईदारपणा आणण्यासाठी हा 1/4 इंच सीम फुट सर्वांत जलद साधन आहे.

तुम्हाला हवे तेवढे साधे-सरळ किंवा विचित्र शिवण तुम्ही शिवू शकता आणि परिणाम हा शेवटी चांगलाच असेल ! हे विस्मयकारक नाही का?